I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 171-175
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

Reg. No. : MH-NGPA/000197
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# कोविड 19 नंतरच्या उच्च माध्यमिक स्तरावरच्या समस्यांचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास

J. S. Rajnikant
Gharada Institute of Technology Lavel Khed, Dist. Ratnagiri.
*Corresponding Author: counselor@git-india.edu.in

**सारांश -**

सध्या एप्रिल, मे, जून, महिन्यास कोविड 19 ने भारतासह जगात धुमाकूळ घातला आहे. सर्वच क्षेत्रात मोठ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. सामाजिक, आर्थिक, राजकिय समस्यांबरोबर मानसशास्त्रीय समस्यांची सुद्धा खूपच भयंकर स्थिती आहे. सर्वसामान्य जीवनात सुद्धा मानसशास्त्रीय समस्यांनी जीवन व्यापले आहे. कोविड 19 मध्ये लॉकडॉऊन सारख्या स्थितीने मानसिक समस्यांत वाढ झाली आहे. आत्महत्या, कोविडची भिती, मानसिक संतुलन बिघडणे, सामाजिक अंतर राखताना भितीच्या समस्या इत्यादी अनेक समस्या निर्माण झाल्या आहे. शिक्षणातील तर समस्या मोठ्या प्रमाणात आहेत. प्राथमिक स्तर, माध्यमिक स्तर, उच्च माध्यमिक स्तर, पदवी स्तरापासून पदव्युत्तर स्तरापर्यंत समस्याच समस्या आहेत. प्रस्तुत संशोधन करताना उच्च माध्यमिक स्तराचा विचार करण्यात आला आहे. कारण या स्तरावर इयत्ता बारावी सारखा महत्वाचा वर्ग आहे. सध्या इयत्ता दहावीचा निकाल न लागल्याने अकरावीच्या विद्याथ्र्याच्या समस्या सध्या अॅडमिशन पुरत्या मर्यादित आहेत. परंतु इयत्ता बारावीच्या समस्या या मोठ्या प्रमाणात आहेत. विद्याथ्र्याच्या मानसिक स्थितीचा विचार करता त्यांना त्या गोष्टींची माहिती लवकर करुन देणे गरजेचे आहे. कारण एप्रिल, मे, जुन, जुलै मध्ये ब-याच प्रमाणात अभ्यास संपलेला असतो. अशा स्थितीत आज कोविड मुळे अभ्यासक्रमाच्या समस्या आहेत, भविष्यातील परीक्षांच्या समस्या आहेत आणि एकूणच शैक्षणिक वर्ष, भविष्यातील विविध क्षेत्रातील प्रवेशाच्या सुद्धा समस्या आहेत. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून इयत्ता बारावीच्या विद्याथ्र्याच्या बाबतीत मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार करण्यात आला आहे.

**Key words: -** कोविड 19, उच्च माध्यमिक स्तर, मानसशास्त्र, अभ्यास इत्यादी

**प्रास्ताविक -**

आपला देश महासत्ता व बलशाली बनविण्यासाठी नवीपिढी घडविण्याचे काम शिक्षकांना करावयाचे असते. त्यासाठी शिक्षकांना सतर्क असणे, जागृत असणे आवश्यक आहे. शिक्षण प्रक्रियेत शिक्षक अध्यापन करतात व विदयार्थी अध्ययन करतात. एवढेचे अभिप्रेत नाही तर विद्यार्थी अध्ययन करत असताना त्यांना अध्ययनात अनेक समस्या निर्माण होत असतात. त्यांना निर्माण होणा-या समस्यांचे निराकरण करणे समस्या सोडविणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे विद्याथ्र्यानाही शिक्षण प्रक्रियेत अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शिक्षणामध्ये अगोदरच अनेक समस्या आहेत. त्यामध्ये कोविड 19 सारख्या आजाराने अनेक नव्या समस्यांची भर पडली आहे. विदयार्थी शाळेत दाखल झाल्यानंतर त्याचा व्यक्तिमत्त्व विकास होणे गरजेचे असते. त्याचा व्यक्तिमत्त्व विकास करीत असताना त्याच्याकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे असते. त्याच्यामध्ये असणा-या उपजत गुणांचा विकास होणे गरजेचे असते. त्याच्यामध्ये असणा-या उपजत गुणांचा विकास करण्याबरोबर त्यांनी काही कौशल्य प्राप्त करणे गरजेचे असते. सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. प्रत्येक ठिकाणी स्पर्धा आहे आणि या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर स्पर्धात्मक परीक्षेला सामोरे जाणे, स्पर्धात्मक परीक्षेत भाग घेणे फार गरजेचे असते. स्पर्धात्मक परीक्षेमुळे आपल्या बुद्धीला चालना मिळेल व बौद्धिक विकास होण्यास मदत होईल.

सद्यस्थितीला कोविड 19 सारख्या आजाराने वरील सर्वच प्रक्रियांवर विद्याथ्र्याची मानसिक क्षमता, विचारकरण्याची प्रक्रिया खंडित झाल्याचे दिसून येते. कारण उच्च माध्यमिक स्तरावरचा महत्वाचा वर्ग इयत्ता बारावी असून यात विज्ञान सारख्या शाखेचे शैक्षणिक वर्ष जणू एप्रिल महिन्यात सुरु होते. जून, जुलै महिन्यात यातील बराच अभ्यासक्रम संपलेला असतो. अशा परिस्थितीत आजच्या घडीला महाविद्यालये, खाजगी क्लासेस सुरु झालेली नाहीत त्यामुळे अभ्यासक्रम शिकविण्यास सुरवात झालेली नाही. अशा परिस्थितीत उच्च माध्यमिक स्तरावरचा विशेषतः विज्ञान शाखेतील विद्यार्थी मानसिक तणावाखाली आहे. कारण शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापासून, अभ्यासक्रम संपण्यापर्यंत आणि भविष्यातील परीक्षा फेब्रुवारीत झाल्यास अभ्यासक्रम संपणार का ? परीक्षा पुढे गेल्यास भविष्यातील प्रवेशाची स्थिती काय असणार ? त्याचबरोबर सद्या बारावीची परीक्षा दिलेल्या विद्याथ्र्यामध्ये निकाल कधी

I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 171-175
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

लागणार ? पुढील वर्हासाठी प्रवेश प्रक्रिया काय असणार ? इत्यादी अनेक कारणांनी विद्यार्थी मानसिक दबावाखाली आहेत.

**संशोधनाची गरज आणि महत्त्व -**

कोविड 19 मुळे उच्च माध्यमिक स्तरावर विद्याश्र्याच्या बुद्धी, व्यक्तिमत्व, ताण, मानसिक विकृती, अभिवृत्ती, सामाजिक प्रभाव, मानसिक कौशल्यांचा विकास या घटकांवर प्रभाव पडलेला आहे. विद्याश्र्याबरोबर सर्वसामान्य व्यक्तीच्या मानवी जीवनात, रोजच्या गरजांशी निगडित घटकांवर परिणाम झालेला आहे. कोविड 19 सारख्या आजाराशी गेल्या अनेक वर्षापासून मानवाचा संबंध आलेला नाही अशा स्थितीत अचानक आलेल्या या महामारीने मानवी जीवन उद्वस्त केलेले आहे. परिणामी सध्याच्या युगात विद्याश्र्यावर कोविड 19 मुळे मानसिक ताण तणाव यासारख्या महत्वाच्या घटकावर परिणाम झाला आहे त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यासाठी इयत्ता बारावीच्या विद्याश्र्यासमोर शैक्षणिक वर्षाच्या बाबतीत सविस्तर माहिती शासन स्तर, महाविद्यालयीन स्तर आवश्यकता भासल्यास मानसोपचार तज्ज्ञांच्या व्याख्यानांच्या आयोजनातून विद्याश्र्याची मानसिक क्षमता वाढीसाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

उच्च माध्यमिक स्तरावरचा अभ्यासक्रम पाहता अभ्यास मंडळाने तयार केलेली उद्दिष्टे विद्याश्र्याच्या आणि अभ्यासक्रमाच्या दृष्टीने योग्य आहेत. विद्याश्र्याचा मानसिक, भावनिक विकास करताना रोजच्या जीवनात विविध विषयांचा वापर करण्याचे कौशल्य विकसित होण्याच्या दृष्टीने उद्दिष्टे ठरविण्यात आलेली आहेत. विविध विषयांच्या अभ्यासाने सामाजिकवृत्ती, जीवनावश्यक कौशल्ये विकसित होण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रम महत्वाचा आहे. परंतु जर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्षात पूर्ण होऊ शकला नाही किंवा अभ्यासक्रम कमी करुन शिकविला गेला तर विषयाची उद्दिष्टे साध्य होणार नाही. ज्या उद्देशाने, कालावधीचा विचार करुन अभ्यासक्रम बनविला गेला आहे त्यास महत्त्व उरणार नाही. याचा सरळ सरळ परिणाम विद्यार्थी या घटकावर मोठ्या प्रमाणावर होणार आहे.

शिक्षण प्रक्रियेतील महत्वाचा घटक हा विद्यार्थी आहे. यात विद्याश्र्याशिवाय शिक्षणाची प्रक्रिया पूर्ण होणार नाही. त्यासाठी ज्या वर्गाचा अभ्यासक्रम तयार करावयाचा तो त्या विद्याश्र्याला कितपत योग्य आहे. त्यातून विद्याश्र्याचा सर्वांगिण विकास शक्य आहे का ? याची तपासणी होणे आवश्यक आहे. तेव्हाच कोणत्याही अभ्यासक्रमाची यशस्वीता सिद्ध होईल. उच्च माध्यमिक स्तरावर दोन वर्ष विद्याश्र्याच्या जीवनातील महत्वाची वर्षे असतात. त्यांचे भवितव्य या दोन वर्षावर बरेच अवलंबून असते. मानसिक अस्वस्थता, आक्रमक वृत्ती यातून त्यांना सावरण्याचे काम अभ्यासक्रम काही अंशी काम करत असतो. इयत्ता बारावी परीक्षेनंतर हे विद्यार्थी स्पर्धा परीक्षा देतात आणि जीवनाच्या वाटेवर एक नव दिशा प्राप्त करण्याचा प्रत्यत्न करतात. त्यासाठी भविष्याचा विचार करुन जो अभ्यासक्रम तयार झाला आहे. तो त्यांना भविष्याच्या महत्वाची जाणिव करुन देताना दिसतो. परंतु सद्य घडीला तो अभ्यासक्रम पूर्ण होईल की नाही ? ही शंका विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शासन त्याचबरोबर शिक्षण तज्ज्ञांनाही आहे. या सर्वांचा मानसिक परिणाम विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या घटकावर असणार आहे.

1. कोविड 19 नंतरच्या उच्च माध्यमिक स्तरावरच्या समस्यांचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करताना विद्याश्र्याच्या मानसिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी संशोधन महत्वाचे आहे.
2. कोविड 19 नंतर शैक्षणिक समस्या मानसशास्त्रीय दृष्टीने जाणून घेताना त्यावर उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने संशोधन महत्वाचे आहे.
3. विद्याश्र्याच्या ताणतणावाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने संशोधन आवश्यक आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

1. कोविड 19 नंतरची उच्च माध्यमिक स्तरावरची स्थिती जाणून घेणे.
2. कोविड 19 नंतरच्या उच्च माध्यमिक स्तरावरच्या समस्यांचा अभ्यास करणे.
3. कोविड 19 नंतरच्या उच्च माध्यमिक स्तरावरच्या समस्यांचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

**नमुना निवड**

प्रस्तुत संशोधनासाठी उच्च माध्यमिक स्तरावरील विद्याश्र्याची सप्रयोजन निवड केली आहे.

**संशोधनाची साधने**

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती संकलनासाठी प्रश्नावली, निरीक्षण, मुलाखत यांचा वापर केला.

**विवेचन -**

Health is wealth हा सुविचार आपले विद्यार्थी सुवाच्च अक्षरात फळयावर लिहितात. पण हल्ली असे जाणवायला लागले की या सुविचाराचा अर्थ त्यातील मर्म हे विद्यार्थी जाणतात की नाही ? यात शंका येते. सध्या कोविड 19 सारख्या महामारीने संपूर्ण जगाचे लक्ष विचलित आहे. अशा स्थितीत उच्च माध्यमिक स्तरासह सर्वच स्तरावर विद्याश्र्याचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्याबरोबर त्याचे मानसिक आरोग्य बिघडण्याची सुद्धा शक्यता निर्माण झाली आहे याची कारणे पाहिल्यास शाळा, महाविद्यालय सुरु होण्यापासून ते अभ्यासक्रम पूर्णता, परीक्षा या सर्वच क्षेत्रात समस्या आहेत. यावर वेळीच उपाययोजना करणे आवश्यक आहे. अन्यथा त्याचा परिणाम विद्याश्र्याच्या मानसिकतेवर मोठ्या प्रमाणात होणार आहे. विद्याश्र्याचे मानसिक स्वास्थ त्यांचे आरोग्यावर कोविड 19 या महामारीचा परिणाम होत आहे. विद्याश्र्याना अभ्यासक्रमापासून

त्यांच्या भविष्याविषयी चिंता आहे. विद्याश्र्याचे मानसिक स्वास्थ टिकले तर त्याच्या बुद्धिमतेचा विकास होईल. मानसिक आरोग्यावर शारीरिक आरोग्य अवलंबून आहे. त्यामुळे विद्यार्थी सुदृढ राहिल. परंतु सद्य घडीला कोविड 19 मुळे शिक्षण क्षेत्रात अनेक समस्या उभ्या राहिल्या आहेत. काही ठिकाणी ऑनलाईन शिक्षणाचा प्रकार चालू आहे परंतु त्यातील समस्यांची यादी मोठी आहे. ऑनलाईन शिक्षण शहरी भागात काही अंशी यशस्वी होईलही परंतु ग्रामीण भागात याची हमी देता येणार नाही. विद्याश्र्याच्या मानसिक स्थितीवर लक्ष देवून त्यांना सकारात्मक वृत्तीकडे नेणे आवश्यक आहे. सद्या मार्च पासून जून पर्यंत शाळा, महाविद्यालये बंद आहेत त्याचा परिणाम विद्याश्र्याच्या, शिक्षकांच्या मानसिकतेवर झाला आहे. शासनाने शाळा, महाविद्यालये सुरु होण्यासाठी योग्य पावले उचलणे आवश्यक आहे. सर्वात महत्वाचे इयत्ता दहावी आणि उच्च माध्यमिक स्तरावरील इयत्ता बारावीच्या बाबतीत ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे.

**मानसिक स्वास्थ / आरोग्य -**

**आरोग्य -**

व्यक्तीची शारीरिक, मानसिक तसेच सामाजिक सुस्थिती म्हणजे आरोग्य होय.

**सामान्य आजार -**

वरचेवर होणारे पण फार गंभीर स्वरुपाचे नसलेले परंतु लगेच उपचार द्यावेत असे आजार.

**विशिष्ट आजार -**

व्यक्तीच्या जीवनाशी निगडीत असणारे शारीरिक व मानसिक घटकाच्या अवयवांशी निगडित असणारे आजार.

**संसर्गजन्य आजार -**

संपर्काने एका व्यक्तीचा आजार दुस-या व्यक्तीला होतो.

सद्या कोविड 19 या आजाराने मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला आहे. देशात, राज्यात लॉकडाऊन सारखी स्थिती असताना समाजात अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. कोविड 19 मुळे लोकांना आरोग्यसेवा पुरविण्याच्या कामात अनेक अडचणी येत आहेत. त्यांच्यामध्ये अनेक परस्पर निगडित प्रश्न उद्भवत आहेत. रोगांचे धोके व आरोग्यविषयक जोखीम यांचे स्वरूप, अपुरी व सदोष साधनसंपत्ती, आरोग्य प्रणालीचा आराखडा आणि या प्रणालीतील आरोग्य सेवकांचे शिक्षण यांतून हे प्रश्न निर्माण होत आहेत. थोडक्यात कोविड 19 मुळे सामाजिक समस्यांप्रमाणे शिक्षण क्षेत्रालाही नाकारुन चालणार नाही. कारण माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर महत्वाच्या इयत्तांचा प्रश्न निर्माण होत आहे. विद्याश्र्याना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे आणि भविष्यात लागणार आहे. कोविड 19 मुळे विद्याश्र्याना साधारणः खालील प्रकारच्या मानसिक समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ शकतात. त्यासाठी आत्तापासून प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**छिन्नमनस्कता -**

मानसशास्त्रीय दृष्टीने विचार केल्यास हा विकृतीचा आजार गंभीर मनोविकृतीच्या संदर्भात आहे. मानवी जीवन आणि आरोग्याची काळजी घेणा-या यंत्रणावर जास्त प्रभाव टाकणारी विकृती म्हणून छिन्नमनस्कता विकृती ओळखली जाते. विचार संवेदन आणि भावनांचे तीव्र विसंघटन विचित्र वर्तन आणि सामाजिक संपर्क टाळाणे इत्यादी गुणवैशिष्ट्यांची मुक्त मनोविकृतीच्या समूहाला छिन्नमनस्कता असे म्हणतात

स्किझोफ्रेनिया याचा अर्थ दुंभणारे मन असा आहे या विकृतीच्या आजारामध्ये व्यक्तीच्या विचार प्रक्रियेमधील संघटना बिघडते. विचार आणि भावनामध्ये ताळमेळ नसते. वास्तवापासून खूप दूर अंतरावर गेलेल्या व्यक्ती स्वतः च्याच विचारांमध्ये गुरफटलेल्या आढळतात.

मानसिक विसंवाद, भावनिक दारिद्र, सामाजिक संपर्काचा अभाव, भ्रम, अवस्तुभ्रम आणि विक्षिप्त चमत्कारिक वर्तन व वैचारिक प्रक्रिया कोलमडते अशी सर्व गंभीर लक्षणे या विकृती मध्ये निर्माण होतात.

ताण, तणावात्मक प्रसंग यामुळे छिन्नमनस्कतेच्या कारक घटकामध्ये जैविक घटकांच्या बरोबरीने मानसशास्त्रीय घटकांचे स्थान ही महत्वाचे आहे.

सध्या विद्यार्थी गेली चार ते पाच महिने घरी आहे. परीक्षा नाही, निकाल नाही, जून नंतर शाळा कधी सुरु होईल याची माहिती नाही. त्यामुळे विद्याश्र्यासह शिक्षकांची मानसिकता संपलेली आहे. उच्च माध्यमिक स्तरावरचे विद्यार्थी जे आपल्या अभ्यासाच्या, भविष्याच्या बाबतीत अत्यंत जागरुक असतात अशा विद्याश्र्यामध्ये छिन्नमनस्कता निर्माण होऊ शकते. प्राथमिक किंवा माध्यमिक विद्याश्र्याच्या बाबतीत हा धोका कमी असला तरी उच्च माध्यमिक स्तरावर हा धोका नाकारुन चालणार नाही.

लॉकडाऊनमुळे सर्व क्षेत्रात विविध बदल दिसून येत आहेत. यात शिक्षण क्षेत्र वेगळे नाही. शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती ऑनलाईन शिक्षण, इंटरनेट च्या माध्यमातून ई साहित्यापासून शिक्षण यात पॉवरपाईन्ट प्रेझेंटेशन, व्हिडिओ, ॲनिमेशन इत्यादीच्या माध्यमातून शिक्षणासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु हे एका ठराविक वयोगटासाठी किंवा इयत्तांसाठी ठिक संकल्पना वाटते परंतु इयत्ता दहावी किंवा इयत्ता बारावी या महत्वाच्या वर्गांना या संकल्पनांचा उपयोग फारसा होईल असे वाटत नाही. यात इयत्ता बारावीला तर अभ्यासक्रमाची, विविध संकल्पनांची व्याप्ती पाहता शिक्षकांच्या ज्ञानाशिवाय त्यांच्या अध्यापनाशिवाय पर्याय नाही असे मानावे लागेल. पण सद्य घडीला शिक्षकांच्या शिकविण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण अजून शाळा, महाविद्यालये बंद आहेत. शिक्षकांना अध्यापन करुन चार ते पाच महिन्याचा कालावधी गेला आहे. त्यांना पुन्हा अध्ययन अध्यापन प्रक्रियेत येण्यात कोविड 19 सारख्या आजाराने त्यांची मानसिकता सुद्धा

अभ्यासणे गरजेचे आहे. विद्यार्थी सुद्धा अध्ययन प्रक्रियेपासून बराच कालावधी दूर आहे. अशा परिस्थितीत शिक्षणाशी संबंधित सर्वच घटकांच्या मानसिकतेचा विचार होणे गरजेचे आहे. उच्च माध्यमिक स्तरावर तर मानसोपचार तज्ज्ञांच्या माध्यमातून प्रथम विद्याथ्र्याना शिक्षणाच्या सद्य स्थितीबद्दल जाणीव करुन देणे आवश्यक आहे. भविष्यात शिक्षणाची स्थिती कशी असावी याबाबत तज्ज्ञ व्यक्ती कयास लावत आहेत परंतु त्याबाबत अजूनही कोणी ठोस भूमिका मांडलेली नाही. कोविड 19 महामारीने संपूर्ण जगाचं समाजकारण, अर्थकारण, राजकारण बदलून टाकलं आहे. यात शिक्षण क्षेत्रातले मोठे बदल नाकारुन चालणार नाही. या क्षेत्रातही मोठी उलथापालथ होणार यात शंका नाही. सामाजिक आणि आरोग्य क्षेत्रात कोविड 19 मुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे भारतासारख्या देशातही डिजीटल लर्निंग, ई लर्निंगचा बाजार मोठ्या प्रमाणावर होणार आहे. त्यामुळे लघु अभ्यासक्रमांना महत्त्व येणार आहे. ऑनलाइन शिक्षणाला गती मिळणार आहे. शिक्षणाचं हे नवं माध्यम स्विकारणे क्रमप्राप्त होणार आहे. लोकांवरचा डिजीटल लर्निंगचा परिणाम होत राहणार आहे. परंतु या झाल्या भविष्यातील नांदी. सदय स्थितीला सर्वात महत्वाचा प्रश्न निर्माण होतो तो इयत्ता बारावी सारख्या महत्वाच्या इयत्तेचा. यात भविष्यातले इंजिनिअर, डॉक्टर, वैज्ञानिक, शिक्षक, शासकीय अधिकारी होणारे घटक आहेत. त्यांना अभ्यासक्रमाची माहिती त्या त्या इयत्तेत होणे आवश्यक आहे. पण सद्या अभ्यासक्रमाच्या बाबतीत सर्वांच्या मनात शंका आहे.

शाळा, महाविद्यालयांमध्ये डिजीटल शिक्षणाचा विकास होण्यास सुरवात झाली आहे त्यात आणखी भर पडेल. सोशल मेडिया, विविध प्रकारची शैक्षणिक ॲप्स, व्हॉट्स अप, मीट, झूम, टीम्स सारखी ॲप्स आणि इमेल्ससारख्या साधनांचा वापर मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक बनेल. शाळा, महाविद्यालये यांच्या विकासासाठी शैक्षणिक संस्था डिजिटल साहित्याच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यावर भर देतील. शिक्षक आणि विद्यार्थी घरबसल्या शिक्षणाचे धडे गिरविण्याचा प्रयत्नही करतील. शिकणे आणि शिकवण्याचे कार्य सुरू राहील. अशा शैक्षणिक यंत्रणा भविष्याचा विचार करुन विकसित करण्यासाठी शाळा, महाविद्यालये, शिक्षणसंस्था शिक्षण क्षेत्रात मोठी गुंतवणूक करतील. परंतु यामध्ये आणखी एक महत्वाचा प्रश्न आहे तो म्हणजे या क्षेत्रात कार्य करणारांची मानसिकता. तंत्रज्ञानाची फारशी माहिती नसणारा शिक्षकवर्ग यात आहे. तर ग्रामीणसह शहरी भागात इंटरनेट सुविधांची वानवा आहे. किंवा बाजारात अनेक ऑनलाईन सॉफ्टवेअर, ॲप्स आहेत. त्यातील प्रत्येकाची उपयुक्तता अभ्यासणे कोणालाच शक्य नाही. शिक्षणपद्धतीचा अभ्यास केल्यानंतर विविध देशांनी उच्च शिक्षण संस्थामध्ये पारंपरिक परीक्षांऐवजी ऑनलाइन परीक्षा, मूल्यांकन पद्धतीचा पुरस्कार केला आहे. परंतु भारतासारख्या देशात या सोयी सुविधा इतक्या लवकर आत्मसात करणे अशक्य आहे. त्यासाठी सरकारला डिजीटल शिक्षणाच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

कोरोनामुळे सद्या ऑनलाईन शिक्षण देण्यासाठी स्पर्धाच निर्माण झाली आहे. पण यातून एक काळजी घेणे आवश्यक आहे की, सद्याचे शिक्षण केवळ माहिती आणि ज्ञान देण्यापुरते मर्यादित राहू नये. कारण मंडळाने ठरविलेला अभ्यासक्रम, अभ्यासक्रमाची उद्दिष्टे, आवश्यक कौशल्ये विद्याथ्र्याच्या अंगी रुजविण्याचे प्रयत्न करणे आवश्यक आहे ते डिजीटल शिक्षणातून कसे शक्य होणार यात शंका आहे याचाही बारकाईने विचार करणे आवश्यक आहे.

आज कोरोनामुळे आपणास डिजीटल शिक्षणाची गरज वाटू लागली. परंतु संगणकाच्या क्रांतीनंतर काही वर्गातच भारताने बदलत्या जगाची नस ओळखून तयार रहायला हवे होते. गेल्या 10 वर्षात डिजीटल शिक्षणाच्या बाबतीत शिक्षण, शिक्षक आणि विद्यार्थी या घटकाकडे प्रतिनिधित्व देवून शिक्षणात क्रांती करता आली असती. परंतु शासनची उदासिन धोरणे, संगणक शिक्षणाकडे केले गेलेले दुर्लक्ष यामुळे आज कोरोनाच्या महामारीत नव्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. परंतु या गोष्टी अचानक होणा-या नाहीत. त्यासाठी वेळ द्यावा लागेल. शिक्षक, विद्यार्थी आणि एकूणच शिक्षण व्यवस्थेत काम करण्याची मानसिक क्षमता त्यासाठी तयार करणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षणातील मूलभूत गोष्टींकडे दुर्लक्ष न करता मानसिक घटकांपासून विचार करावा लागेल. देशाचे, जगाचे भविष्य असणाÚया शिक्षण या गुंतवणुकीकडे केवळ गरजेनुसार पाहणे योग्य ठरणार नाही. त्यासाठी एक संधी मानून आज प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक घटकांच्या डिजीटल घटकापासून मानसिक घटकापर्यंत विकासास नव्याने प्रारंभ करावा लागेल.

**निष्कर्ष -**

भारतीय जनतेच्या राहणीमानाचा दर्जा वाढवावा, तिचे सुपोषण साधावे आणि सार्वजनिक आरोग्य हि सुधारावे हे भारतीय शासनाचे प्राथमिक कर्तव्य असल्याचे भारतीय संविधानातच नमूद केले आहे. हे मार्गदर्शक तत्व प्रत्यक्षात आणण्यासाठी सार्वजनिक आरोग्यविषयक प्रश्नाला शासनाने योग्य तो अग्रक्रम दिला आहे. सद्या कोविड 19 मुळे मानवी आरोग्याची पातळी सुधारावी म्हणून केंद्र शासन, राज्य शासन यांच्यात समन्वय निर्माण होऊन सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्राबरोबर मानसशास्त्रीय क्षेत्रात विचार विनिमय होऊन सर्व क्षेत्रात असणा-या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. राज्य शासनाने शिक्षणातील समस्यांना लक्ष करुन त्याच्या निराकरणासाठी प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. संशोधनाच्या कार्यवाहीत उच्च माध्यमिक स्तरावरील इयत्ता बारावीच्या 20 विद्याथ्र्याना प्रश्नावली, मुलाखतीच्या माध्यमातून कोविड 19 महामारीने

उदभवलेल्या समस्येवर त्यांना असणा-या शंकाच्या बाबतीत माहिती घेतली त्यावरुन निष्कर्ष काढले.

1. सद्य स्थितीला महाविद्यालये कधी सुरु होणार या विषयी विद्याश्र्याना उत्सुकता आहे.

2. महाविद्यालयांमध्ये मे, जुन, जुलै मध्ये ब-याच प्रमाणात अभ्यासक्रम पूर्ण होतो. काही घटक चाचण्या होतात, सायन्स सारख्या विषयात प्रॅक्टिकल्स पूर्ण होतात. थोडक्यात 40ः काम जुलै पर्यंत पूर्ण होत असते. त्याबाबत विद्याश्र्याना समस्या आहेत.

3. अभ्यासक्रम शिकविण्यासाठी सुरवात नसल्याने अभ्यासक्रम उर्वरित महिन्यात कमी केला जाणार का ? याविषयी विद्याश्र्याच्या मनात शंका आहेत.

4. उच्च माध्यमिक स्तरावर विद्याश्र्याना सदर शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रम संपण्याविषयी शंका आहेत.

5. अभ्यासक्रम कमी केला गेला तर शैक्षणिक वर्षात पुर्ण होणारी विषयाची उद्दिष्टे पूर्ण होणार का ? याबाबत विद्याश्र्याना समस्या जाणवतात.

6. विद्याश्र्याना भविष्यात फेब्रुवारी 2021 मध्ये असणा-या परीक्षेच्या बाबतीत समस्या आहेत. कारण जर परीक्षा फेब्रु 2021 ला झाली तर त्यासाठी अभ्यासक्रम कोणता असेल? अभ्यासक्रमात सर्वच घटक असतील गुणांमध्ये परिणाम जाणवणार आहे.

7. भविष्यात सन 2021 मध्ये अॅडमिशन कसे असतील? कारण गुण कमी मिळाले तर चांगल्या क्षेत्रात अॅडमिशन मिळणार नाही.

वरील समस्यांचा परिणाम विद्याश्र्याच्या मानसिक स्थितीवर पडत आहे. त्यामुळे शासन स्तरावरुन आता हालचाली गतीमान होणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची**

डॉ. राजहंस मानसी, पाटील अनघा, डॉ. सुर्वे सुशील, अपसामान्यांचे मानसशास्त्र, उन्मेश प्रकाशन, पुणे.

डॉ. दादासाहेब शिणगावे, मधुकर शेडगे, मानसशास्त्र, धैर्य प्रकाशन, पुणे.

वि. दि. तडसरे, मानसशास्त्र, फडके प्रकाशन, पुणे.

https://www.deshonnati.com/article/news-detail/226_16249901

https://www.news9maharashtra.com/%E0%A4%AE%E0%A4%B9%E0%A4%BE%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%B7%E0%A5%8D%E0%A4%9F%E0%A5%8D%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%A4%E0%A5%80%E0%A4%B2-%E0%A4%B6%E0%A4%BE%E0%A4%B3%E0%A4%BE-%E0%A4%B8%E0%A5%81%E0%A4%B0%E0%A5%82/

https://www.maxmaharashtra.com/max-reports/covid-19-as-govt-denies-community-transmission-experts-say-too-few-tested-to-know/79309/

https://m.dailyhunt.in/news

https://www.dainikprabhat.com/impact-of-corona-on-education-dr-swati-mujumdar/

https://www.esakal.com/education-jobs/corona-impact-education-281157